क्रमांक:-पोअगों/आस्था/कक्ष १० (ब)सेवाजेष्ठता सुची-२०२३- 755
पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचे कार्यालय,
पतंगा मैदान, फुलचूर, ता. व जि. गोंदिया
पीन कोड : ४४१ ६०१
e-mail : sp.gondia@mahapolice.gov.in
दिनांक :-13/०२/२०२३

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:
एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक-२१/१०/२०११
२) मा. पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचेकडील स्थायी आदेश क्र.२२/२०१३
पोमसं/६/१०/पोशि भरती-सेवाजेष्ठता/२५१/२०१२, दिनांक-१७/०८/२०१३.

विषय :- सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई व चालक नाईक पोलीस शिपाई ते चालक पोलीस शिपाई यांचे सन २०२२ ची अंतिम सेवाजेष्ठता सुचीबाबत.

-------oooooo-------

उपरोक्त संदर्भाकींत विषयान्वये कळविण्यात येत आहे की, गोंदिया जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई व चालक नाईक पोलीस शिपाई ते चालक पोलीस शिपाई या प्रत्येक सवंर्गाची पदनिहाय **तात्पुरती (Provisional) सेवाज्येष्ठता सुची-२०२२-२०२३**, दिनांक ३१/१२/२०२२ पर्यत तयार करण्यात आलेली असुन या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोअगो/आस्था/सेवाजेष्ठता सुची/२०२२-२०२३/२९० दिनांक २३/०१/२०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली. सदर तात्पुरत्या सेवाजेष्ठता सुची मध्ये पोलीस अंमलदार यांना कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास दिनांक ०१/०२/२०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सहा. फौजदार, पोलीस हवालदार, नाईक पोलीस शिपाई, पोलीस शिपाई व चालक नापोशि ते चालक पोशि या प्रत्येक संवर्गाचे आक्षेपांची पुर्तता करण्यात आली. तसेच सदरहु पोलीस अंमलदार यांचे अंतिम सेवाजेष्ठता सुची तयार करण्यात आली असून सदर सेवाजेष्ठता सुची पोलीस अंमलदारांचे माहिती करीता सर्व पोलीस स्टेशन, पोलीस मुख्यालय गोंदिया व उपमुख्यालय देवरी येथे पाठविण्यात येत आहे. तसेच सदरची सेवाज्येष्ठता सुची या कार्यालयाचे **Gondia police.gov.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरची **अंतिम (Final) सेवाज्येष्ठता सुची** प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन, पोलीस मुख्यालय गोंदिया, उप मुख्यालय देवरी यांनी त्यांचे अधिनस्त असलेले पोलीस अंमलदार व तसेच प्रभारी अधिकारी सर्व शाखा, अेओपी, सी ६० पार्टी यांनी त्यांचे अधिनस्त असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई व चालक नाईक पोलीस शिपाई ते चालक पोलीस शिपाई या संवर्गातील सर्व पोलीस अंमलदार यांचे निदर्शनास आणून दयावी याबाबत सर्व प्रभारी अधिकारी गोंदिया जिल्हा पोलीस दल यांना सुचित करण्यात येत आहे.

(निखील पिंगळे)
**पोलीस अधीक्षक, गोंदिया.**

प्रति,

सर्व ठाणेदार गोंदिया जिल्हा , रापोनि पो.मु.गोंदिया, प्रभारी अधिकारी उपमुख्यालय देवरी
२/- आपले अधिनस्त असलेले सर्व शाखा, अेओपी, सी-६० पार्टी यांचेकडील पोलीस अंमलदार यांना सदरची सेवाजेष्ठता सुची निदर्शनास आणून दयावी.

प्रत,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल पोलीस अधीक्षक, कार्यालय गोंदिया
२/- सोबत जोडण्यात आलेली तात्पुरती सेवाजेष्ठता सुची या कार्यालयाचे वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात यावी व त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

प्रत माहितीस्तव

अप्पर पोलीस अधीक्षक, गोंदिया कॅम्प देवरी
पोलीस उपअधिक्षक (मुख्या.) गोंदिया,
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया जिल्हा